मंत्रालय विस्तार इमारतीतील ४ थ्या मजल्यावरील महसूल व वन विभागाच्या दालन क्र.४६१ मधील खुल्या दालनात अवर सचिवांच्या बैठकीकरीता केबिन्स तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणे व निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. अ.बै.व्य-२०१७/प्र.क्र.१५/ गृ.व्य.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०५ जानेवारी, २०१८

संदर्भ :- कार्यकारी अभिंयता, इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई -१ यांचे पत्र क्र. इशवि/प्रशा/दक्षिण/१८७० दि.०८/११/२०१७.

प्रस्तावना :-

मंत्रालय विस्तार इमारतीमधील ४थ्या मजल्यावरील महसूल व वन विभागाच्या दालन क्र.४६१ मधील खुल्या दालनात दोन अवर सचिवांची बैठकीची व्यवस्था आहे. या दालनामध्ये सदर दोन्ही अवर सचिवांकरीता नवीन केबिन्स तयार करण्याकरिता कार्यकारी अभियंता, मुंबई इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई -१, यांचेकडून सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची व निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

या शासन निर्णयान्वये, मंत्रालय विस्तार इमारतीमधील ४थ्या मजल्यावरील महसूल व वन विभागाच्या दालन क्र.४६१ मधील खुल्या दालनात दोन अवर सचिवांची बैठकीची व्यवस्था आहे. या दालनामध्ये सदर दोन्ही अवर सचिवाकरीता नवीन केबिन्स तयार करण्यासाठी कार्यकारी अभियंता, मुंबई इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई -१, यांचेकडून सादर करण्यात आलेल्या एकूण रु.१,५७,६१४/- (रूपये एक लाख सत्तावन हजार सहाशे चौदा फक्त) एवढया अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. त्याच प्रमाणे या शासन निर्णयान्वये, सदर कामासाठी लागणारा रु.१,५७,६१४ (रूपये एक लाख सत्तावन हजार सहाशे चौदा फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीव्दारे, वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

३. या प्रयोजनार्थ होणारा खर्च मागणी क्र. "सी-४ २०५२-सचिवालय सर्वसाधारण सेवा, (००) (०९०) सचिवालय, (००) (०१) महसूल व वन विभाग, (२०५२-०२१२) १३- कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१७-२०१८ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या रकमेचे आहरण करून संबंधितांना वितरीत करण्याकरीता कार्यासन अधिकारी (रोखशाखा) विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच उप सचिव (रोखशाखा) विभाग, मंत्रालय, मुंबई,

यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सबब मंजूर केलेली रक्कम अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून आहरित करून संबंधितांना वितरीत करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी यांनी करावी.

५. हा शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निणय क्र. विअप्र.-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दिनांक १८ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकारी नियमपुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग- एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये सुधारणा करण्याबाबत मधील अनुक्रमांक १६ नियम क्रमांक ६४, अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०५१५१०४५७३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Raghuvir Dhondiram Katke

Digitally signed by Raghuvir Dhondiram Katke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f594954bd799968aa50aaa40154cd3ad3a03629589 0af4cd43ecc9f22dcb87a, serialNumber=c7afd3f6d4faa0e6c98e10d28dc71b935654c78 3f0397a6cdbefaeb5f6eef9da, cn=Raghuvir Dhondiram Katke
Date: 2018.01.05 15:15:42 +05'30'

(र.धों. कटके)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर, सार्वजनिक बांधकाम विभाग, बांधकाम भवन, दुसरा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१,

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य- १ , (मुंबई)
२. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य- १ , (मुंबई)
३. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
६. आहरण व संवितरण अधिकारी, रोखशाखा महसूल व वन विभाग, मुंबई-४०० ०३२
७. निवडनस्ती, आस्था-०२ महसूल व वन विभाग, मुंबई-४०००३२